प्रेस नोट ता. १६/०२/२०२४

# मोक्का गुन्हयातील पाहीजे आरोपीस पिस्टलसह अटक

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

दिनांक १५/०२/२०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये अवैध शस्त्र बाळगणा-या गुन्हेगारांविरुध्द विशेष मोहीम राबवुन तपासणी करीत असतांना सहा.पोलीस फौजदार दिपक खरात यांना गोपनिय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, शरिराविरुध्द गुन्हे करणारा सराईत - रेकॉर्डवरील, मोक्का गुन्हयामध्ये पाहीजे असलेला गुन्हेगार जतिन उर्फ सोनू बिपीन टाक रा. पिंपरी हा त्याचे कमरेला पिस्टल लावुन पिंपरी परिसरात संशयितरित्या फिरत आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त संदिप डोईफोडे व सहा.पोलीस आयुक्त सतिश माने यांना याबाबतची माहीती कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे एक पथक तयार केले. सदर पथकाला सुचना व मार्गदर्शन करुन तात्काळ पिंपरी भागात रवाना केले व सदर आरोपीचा शोध घेतला असता रिव्हररोड सुभाषनगर झुलेलाल मंदीराजवळ थांबला असल्याची माहीती मिळालेने त्या परिसरात सापळा लावला. रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार जतिन उर्फ सोनू टाक हा घराचे बाजुला थांबला असल्याचे पोलीस पथकाचे निदर्शनास आले त्याचवेळी त्यास पोलीस आल्याची चाहूल लागल्याने तो पळुन जाण्याचे तयारीत असतांना पोलीस पथकाने अत्यंत शिताफीने पकडले. त्याचे अंगझडतीमध्ये कमरेला लावलेले एक पिस्टल व दोन जिवंत काडतुसे मिळुन आली.

रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार जतिन उर्फ सोनू बिपीन टाक वय २९ रा. सुभाषनगर रिव्हररोड झुलेलाल मंदीरजवळ पिंपरी पुणे याचेविरुध्द खुनाचा प्रयत्न, जबरीचोरी, मारामारी, आर्म ॲक्ट, दुहेरी मोक्का असे गंभीर स्वरुपाचे १६ गुन्हे दाखल आहेत. श्री गणपती विसर्जन २०२३ रोजी जतिन उर्फ सोनू बिपीन टाक याने पिंपरी येथे फिर्यादी रोहीत भगवान वाघमारे रा. मिलींदनगर पिंपरी याचेशी भांडण - मारामारी करुन पिस्टल लावुन जिवे ठार मारण्याच्या प्रयत्न केला होता व तेव्हापासुन तो पळुन गेला होता. त्याचेविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये दोन गुन्हे दाखल असुन एका गुन्हयामध्ये तो पाहीजे आरोपी आहे. आरोपीत याने बेकायदेशीर विना परवाना जवळ बाळगलेल्या पिस्टलबाबत सखोल विचारपुस करुन आरोपीत याचे विरुध्द गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस कॉस्टेंबल बक्कल नंबर १९२० अजित आण्णा सानप यांची सरकार तर्फे भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे फिर्याद घेवून पिंपरी पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चौबे, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री संदिप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक केराप्पा माने, सपोफौ दिपक खरात, दिलीप चौधरी, जमीर तांबोळी, विपुल जाधव, नामदेव कापसे, सागर अवसरे, अजित सानप, शिवाजी मुंढे, उध्दव खेडकर यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड